ePaper
मणिपूरमधील 'केपीए' पक्ष सरकारमधून बाहेर!



| वर्ष - 7 । अंक - 97 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- फायनलमध्ये प्रणय पराभूत
- साराचे टिकली लावून फोटोशूट
- पुढची पिढी माफ करणार नाही!
- मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार !


www.mahaenews.com । सोमवार, दिनांक 7 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# सहकार क्षेत्रात महाराष्ट्र अव्वल!

## » केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांचे प्रतिपादन



**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**सर्वसामान्यांचा उद्धार करणे हाच सहकार क्षेत्राचा उद्देश आहे. आज संपूर्ण देशात 1 हजार 555 कोऑपरेटीव्ह सोसायट्यापैकी 42 टक्के सोसायटी एकट्या महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे या पोर्टलचा सर्वाधिक फायदा महाराष्ट्राला सर्वाधिक होणार आहे. महाराष्ट्राची ही ताकद दाखविण्यासाठी मी इथे आलो असल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी केले.**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते बहुराज्यीय सहकार संस्थांसाठी तयार करण्यात आलेल्या वेब पोर्टलचे त्यांच्या हस्ते नुकतेच उद्घाटन करण्यात आले. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात हा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमाला केंद्रीय सहकार राज्यमंत्री बीएल वर्मा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, हर्षवर्धन पाटील, सहकार विभागाचे सचिव ज्ञानेश कुमार आदी या वेळी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री अमित शहा म्हणाले की, राज्याची सहकार कार्यालये देखील संगणकीकृत केली जातील. सहकार क्षेत्र पारदर्शकतेशिवाय पुढे जाणार नाही. पारदर्शक व्यवस्था समाजाच्या 60 कोटी लोकांना जोडेल. सहकारातून समृद्धी या तत्वानुसार नरेंद्र मोदी यांनी देशभर सहकार क्षेत्राला बळकटी देण्याचे काम केले आहे. गरीब व्यक्तीच्या मनात जे उद्देश होते, ते पूर्ण करण्याचे काम मोदी सरकारने नऊ वर्षात केले आहे. गरिबांना घर, घरात शुद्ध पाणी, सिलेंडर, शौचालय, विमा, मोफत अन्न आणि वीज देण्याचे काम केले. राहणीमानाचा दर्जा सुधारण्याचे स्वप्न गरीब नागरिक बघू लागला आहे. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सहकार क्षेत्र अधिक फायदेशीर आहे, असे मत केंद्रीय मंत्री शहा यांनी व्यक्त केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, सहकार मंत्रालयाच्या कामात केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी स्पष्टता आणली. काही काळी व्यक्तिगत फायद्यासाठी उपयोग केल्याने सहकार क्षेत्र अडचणीत आले होते. त्यामध्ये बदल करण्यात आल्याने सहकार क्षेत्राला चांगले दिवस आले आहेत. उस उत्पादक शेतकऱ्यांसाठीचा एकूण 10 हजार कोटी रुपयांचा अन्यायकारक इन्कम टॅक्स माफ करण्याचे धाडस शहांनी दाखविले. 370 कलम हटविले. बलशाली भारताचे स्वप्न सहकारातूनच स्थापन होईल. त्यासाठी राज्य सरकार पुर्ण ताकदीने इगो, अहंकार सोडून केंद्राच्या पाठिशी राहिल.

## » चिंचवड येथे बहुराज्यीय सहकार संस्थांच्या वेब पोर्टलचे शहांच्या हस्ते उद्घाटन

### पंतप्रधानांमुळे सहकार क्षेत्रासाठी नवा विभाग

» उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, 120 वर्षांचा सहकार क्षेत्राचा इतिहास आहे. आर्थिक, सामाजिक विकासात सहकार क्षेत्र बदल घडवून आणेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुरदृष्टी ठेऊन सहकार क्षेत्रासाठी नवा विभाग निर्माण केला. उस उत्पादक शेतकऱ्यांचा आयकर माफ करण्यासाठी या पुर्वी 22 वर्षे आम्ही केंद्रात हेलपाटे मारले. मात्र हा कर माफ करण्याचे धाडस कोणत्याही सरकारने केले नाही. ते केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी करून दाखविल्याचे अजित पवार म्हणाले. केंद्र सरकारमार्फत 44 रेल्वे स्टेशनचा विकास सुरू असून त्यासाठी 80 हजार कोटी रुपयांचा निधी दिला आहे. मेट्रो, पुणे नाशिक महामार्गावर सेमी लाईन टाकण्याबाबत प्रस्ताव देण्याचे केंद्रीय मंत्री शहांनी सांगितले असून त्याबाबत ते सकारात्मक आहेत.

# दादा; आता योग्य ठिकाणी बसलात!

## » अमित शाह म्हणतात: ...पण उशीर झाला!

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

उपमुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदाच अजित (पवार) दादा येथे आले आहेत. मी त्यांच्यासोबत पहिल्यांदाच स्टेजवर परफॉर्म करत आहे. मला त्यांना सांगायचे आहे, दादा तुम्ही खूप दिवसांनी योग्य ठिकाणी बसला आहात. ही जागा बरोबर होती पण तुम्हाला खूप उशीर झाला आहे.

'केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी पुण्यात ही माहिती दिली. चिंचवड येथील रामकृष्ण मोरे सभागृहात अमित शहा यांच्या उपस्थितीत केंद्रीय सहकारी संस्थांच्या निबंधकांनी विकसित केलेल्या संकेतस्थळाचे उद्घाटन करण्यात आले. दुपारी शहा यांच्या हस्ते वेबसाइटचे उद्घाटन करण्यात आले.

अमित शहा म्हणाले की, महाराष्ट्र ही सहकाराची राजधानी आहे. येथूनच देशात सहकाराची संस्कृती रुजली.



विठ्ठलराव विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ आणि वैकुंठभाई मेहत यांसारख्या अनेक सहकार महर्षींनी महाराष्ट्राला सहकार क्षेत्रात विशेष स्थान मिळवून दिले, त्यामुळेच हे मॉडेल देशभर पोहोचले. ते म्हणाले की, सहकार चळवळीच्या विकासाची दिशा पाहिली तर जुन्या मुंबईचा भाग असलेल्या गुजरात, महाराष्ट्र आणि कर्नाटकातून सहकार चळवळ वाढली आणि विकसित झाली.

शाह म्हणाले की, आज मल्टी स्टेट कोऑपरेटिव्हचे संचालन करणाऱ्या केंद्रीय निबंधक (CRCS) कार्यालयाचे काम पूर्णपणे डिजिटल होत आहे. यासह सहकारी संस्थांची सर्व प्रकारची कामे मग ती शाखा वाढवणे असो, दुसऱ्या राज्यात जाणे असो, ऑडिट करणे असो, सर्व कामे आता ऑनलाइन कार्यालयातून होणार आहेत.

### 'सहकार से समृद्धी'

» अमित शहा म्हणाले की, पंतप्रधान मोदींनी मांडलेल्या 'सहकारातून समृद्धी' या कल्पनेचे सखोल तत्त्वज्ञान आहे. 9 वर्षात पंतप्रधान मोदींनी कोट्यवधी गरिबांना घरे, शौचालये या मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. आता गरीब श्रीमंत होण्याची स्वप्ने पाहत आहे. त्यासाठी भांडवलाची गरज असून हे भांडवल सहकारातूनच शक्य आहे. 'सहकार से समृद्धी' म्हणजे सर्वात लहान व्यक्तिला त्याचे जीवन सुधारण्याची संधी देणे आणि देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये योगदान देण्यासाठी आणि सहकाराच्या माध्यमातून त्यांचे जीवन उन्नत करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करणे.

# दहशतवाद विरोधी पथकाला मोठे यश!

## कोंढवा परिसरातील आयएसचे महाराष्ट्र मॉड्यूल केले उद्ध्वस्त

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोंढवा परिसरातील इस्लामिक स्टेटचे (आयएस) महाराष्ट्र मॉड्यूल दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) उद्ध्वस्त केले आहे. महाराष्ट्र मॉड्यूल प्रकरणी एटीएसने मुंबईतील ऑर्थर रोड कारागृहातून ताब्यात घेतलेल्या झुल्फिकार अली बडोदावाला याने महंमद युनूस महंमद याकू साकी आणि महंमद इम्रान महंमद युसूफ खान यांना पुण्यात आणल्याचे एटीएसच्या तपासात उघडकीस आले आहे.**




जयपूर बॉम्बस्फोट प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) साकी आणि खान यांचा शोध घेत असताना बडोदावाला याने त्यांना पुण्यात आणून त्यांच्या मार्फत बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण शिबिर आयोजित केल्याचे स्पष्ट झाले आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) इस्लामिक स्टेटच्या (आयएस) महाराष्ट्र मॉड्यूलप्रकरणी डॉ. अदनान अली सरकार याला अटक केल्यानंतर एटीएसने अटक केलेल्या दहशतवाद्यांशी त्याचा संबंध असल्याची माहिती पुढे आली. एनआयएने महाराष्ट्र मॉड्यूलप्रकरणी मुंबई, ठाणे आणि पुण्यातून यापूर्वी ताबिश नासीर सिद्दीकी, जुबेर नूर महंमद शेख अबू नुसैबा, शरजील शेख आणि झुल्फिकार अली बडोदावाला यांना अटक केली होती. दहशतवादी कारवायांमध्ये तरुणांना ओढण्यात हा गट सक्रिय होता.

या गटाचे पुण्यात पकडलेल्या दहशतवाद्यांशी लागेबांधे उघड झाल्यानंतर एटीएसने पुण्यातील दाखल गुन्ह्यात बडोदावाला याला नुकतेच मुंबईतील ऑर्थर रोड कारागृहातून ताब्यात घेतले आहे. बडोदावाला याने साकी आणि खान यांना पुण्यात आणून त्यांच्यामार्फत काही तरुणांसाठी बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते.

बडोदावाला याच्या सांगण्यावरून अब्दुल कादिर दस्तगीर पठाण याने साकी आणि खान यांना कोंढव्यात राहण्यासाठी खोली मिळवून दिली होती. साकी आणि खान हे दोघे मूळचे मध्य प्रदेशातील रतलाम येथील रहिवासी असून, दीड वर्षांपासून ते पुण्यात वास्तव्यास होते.

घातपाताच्या गुन्ह्यातील अटक आरोपींकडून पुणे व इतर ठिकाणी रेकी करण्यासाठी वापरलेली दुचाकी आणि कार तसेच पिस्तूल व पाच जिवंत काडतुसे असे साहित्य एटीएसने शनिवारी जप्त केले. शहरात पकडलेल्या दहशतवाद्यांचा देशातील प्रमुख शहरांत बॉम्बस्फोट घडविण्याचा कट होता, अशी माहिती राज्य दहशतवाद विरोधी पथकाच्या (एटीएस) तपासात उघडकीस आली आहे. 'इस्लामिक स्टेट (आयएस) आणि अलसुफा या दहशतवादी संघटनांशी संबंधित या दहशतवाद्यांनी जगभरातील दहशतवादी हल्ल्यांची माहिती घेऊन देशातील प्रमुख शहरांत बॉम्बस्फोट घडविण्याची तयारी केली होती,' असे 'एटीएस'ने न्यायालयात सादर केलेल्या अहवालात म्हटले आहे.

महंमद युनूस महंमद याकू साकी (वय २४), महंमद इम्रान महंमद युसूफ खान (वय २३, दोघे रा. चेतना गार्डन, मीठानगर, कोंढवा), अब्दुल कादिर दस्तगीर पठाण (वय ३२, कोंढवा) आणि सिमाब नसरुद्दीन काझी (वय २७ रा. रत्नागिरी) या चारही आरोपींच्या पोलिस कोठडीत ११ ऑगस्टपर्यंत वाढ करण्याचा आदेश अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. आर. कचरे यांनी शनिवारी दिला. साकी आणि खान यांना पठाण याने कोंढव्यात खोली उपलब्ध करून दिली होती, तर सिमाब याने आर्थिक मदत केली होती.

कोथरूड येथे दुचाकी चोरण्याच्या प्रयत्नातील साकी आणि खान यांच्याकडून पांढऱ्या रंगाची पावडर, काडतूस, दहशतवादी संघटनांची पत्रके तसेच ड्रोनचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. दोघांनी पुणे, कोल्हापूर आणि सातारा येथील जंगलात बॉम्बस्फोट चाचणी केल्याचे उघडकीस आले.

चौकशीदरम्यान त्यांनी ही ठिकाणे एटीएसला दाखवली आहेत, असे सरकारी वकील विजय फरगडे यांनी सांगितले. आरोपींच्या वतीने ॲड. यशपाल पुरोहित यांनी युक्तिवाद केला.

### नकाशे जप्त

दहशतवाद्यांकडून देशातील काही ठिकाणांचे नकाशे जप्त करण्यात आले आहेत. त्यातील एक नकाशा 'एटीएस'ने न्यायालयात सादर केला. निर्बंध असलेले काही रसायने आणि स्फोटक पदार्थांची दहशतवाद्यांनी खरेदी केली होती. या वस्तू खरेदी करताना ओळखपत्र देणे बंधनकारक असते. बनावट आधारकार्ड दाखवून या वस्तू खरेदी करण्यात आल्या. या

> राष्ट्रीय तपास यंत्रणेने महाराष्ट्र मोड्यूल प्रकरणी अटक केलेले आरोपी आणि पुण्यात अटक केलेले आरोपी एकमेकांच्या संपर्कात होते. त्यांनी बॉम्ब तयार करण्याचे प्रात्यक्षिक एकत्रित घेतले होते. हे आरोपी त्यांच्या शिक्षणापेक्षा अद्ययावत साधनांचा वापर करण्यात सराईत आहेत. त्यांच्यामागे मोठी यंत्रणा असल्याची शक्यता आहे.
>
> **- अरुण वायकर,**
> - सहायक पोलिस आयुक्त (एटीएस)

# विजय वडेट्टीवारांचा पुणे दौरा

## नाराजीनाट्याची चर्चा चांगलीच रंगली

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांची नुकतीच विधानसभेच्या विरोधीपक्षनेतेपदी निवड झाली. या निवडीनंतर प्रथमच त्यांनी पुणे शहराचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांना पुणे शहरातील काँग्रेसमधील गटबाजीचा अनुभव आला. पुणे काँग्रेसमध्ये दोन गट असल्याचे यानिमित्ताने समोर आले.**



शहराध्यक्ष अरविंद शिंदे आणि आमदार रवींद्र धंगेकर यांच्यात नाराजी असल्याचे समोर आले. त्यांच्या या दौऱ्यात नाराजीनाट्याची चर्चा चांगलीच रंगली होती. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार पुणे दौऱ्यावर होते. ते पुण्यात येताच काँग्रेसमध्ये नाराजीनाट्य सुरु झाले. विजय वडेट्टीवार पुणे काँग्रेस कार्यालयात जाणार होते. परंतु त्यांनी अचानक आमदार रवींद्र धंगेकर यांच्या कार्यालयात जाण्याचे ठरले.

त्यानंतर त्यांच्या गाडीत असलेले शहराध्यक्ष अरविंद शिंदे नाराज झाले. ते विजय वडेट्टीवार यांच्या गाडीतून उतरले अन् थेट काँग्रेस कार्यालयात आले. त्यामुळे वडेट्टीवार यांच्यासमोर धंगेकर गट आणि शहराध्यक्ष शिंदे गटातील गटबाजी समोर आली. या घटनेमुळे पुणे काँग्रेसमधील धूसफूस पाहायला मिळाली आहे.

### सत्ता सर्वोच्च मानणाऱ्यांना जनता बुडवते

अजित पवार यांनी अमित शाह हे महाराष्ट्राचे जावई असल्याचा उल्लेख आपल्या भाषणात केला होता. त्यावर विजय वडेट्टीवार यांनी अजित पवार यांना घेरले. अजितदादा यांना पाच वर्षांपूर्वी अमित शाह महाराष्ट्राचे जावई होते, हे माहीत नव्हते का? आता अजित पवार यांना हा जावई शोध कसा लागला. अजित पवार सत्तेला सर्वोच्च मानतात. परंतु सत्तेला सर्वोच्च मानणाऱ्या नेत्यांना जनता बुडवल्याशिवाय राहणार नाही.

# महापुरुषांना जाती-धर्मात अडकवू नये; डॉ. सबनीस

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

महापुरुषांनी सर्वधर्म समभावाची शिकवण दिली. त्यांनी कार्य उभारताना जात किंवा धर्म बघितला नाही. समाजातल्या शेवटच्या घटकाचे कल्याण व्हावे, यासाठी या महापुरुषांनी आपले आयुष्य खर्ची घातले. त्यामुळे महापुरुषांना जाती-धर्माच्या चौकटीत अडकवू नये, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते अंकल सोनवणे यांना डॉ. सबनीस यांच्या हस्ते 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक आचार्य रतनलाल सोनग्रा, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष परशुराम वाडेकर आदी उपस्थित होते. अंकल सोनवणे यांनी समर्पित भावनेने दलित चळवळीशी एकनिष्ठ राहून काम उभारले आहे. कृतिशील विद्वत्ता आणि अनुभवाचे शहाणपण त्यांच्याकडे आहे. दलित सेवक संघाच्या माध्यमातून त्यांनी राज्यभरात भरीव योगदान दिले. फुले-शाहू-आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठेंच्या विचारांवर चालणारा हा 83 वर्षांचा कार्यकर्ता आहे.

# तोडफोड टपोरींची धिंड!

## पिंपळे सौदागर घटना : आरोपी काही तासांतच गजाआड

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड शहरातील स्मार्ट परिसर समजला जाणाऱ्या पिंपळे सौदागरमध्ये अज्ञातांनी ९ ते १० वाहनांची तोडफोड केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रात्री दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे.पिंपळे सौदागर मधील काटे पेट्रोल पंप ते गोविंद गार्डन चौक या रस्त्यावर पार्क केलेल्या नऊ ते दहा वाहनांची रात्री तोडफोड झाली आहे.**











रात्री दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास दुचाकीवर आलेल्या अज्ञातांनी मोठ मोठी दगडे फेकत गाड्यांच्या काचा फोडल्या. पिंपरी-चिंचवड शहरातील स्मार्ट सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिंपळे सौदागर मध्ये गाड्या फोडण्याची घटना घडली होती. या घटनेनंतर अवघ्या काही तासातच सांगवी पोलिसांनी गाड्या फोडणाऱ्या आरोपींना अटक केली. त्यानंतर दहशत पसरवणाऱ्या या गुंडांची पिंपळे सौदागरमधून सांगवी पोलिसांनी दिंड काढली. या घटनेमुळे पिंपळे सौदागर परिसरातील नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण असून या अज्ञात व्यक्तींना पकडून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी होत होती. दरम्यान केंद्रीय मंत्री अमित शहा पिंपरी चिंचवड शहराच्या दौऱ्यावर होते. शहरात एकीकडे कडेकोट बंदोबस्त ठेवला गेला असताना वाहनांची झालेली तोडफोड यामुळे या गुंडांवर पोलिसांचा वचक राहिलाच नाही का? असा प्रश्न उपस्थित केला जात होता.

### पोलिसांनी आरोपींच्या मुसक्या आवळल्या

» केंद्रीय गृहमंत्री अमित शहा शहरात होते. त्याच रात्री ही तोडफोड झाल्याने पोलीस प्रचंड दबावाखाली होते. मात्र सीसीटीव्ही आणि तांत्रिक अभ्यास करून सांगवी पोलिसांनी काही तासांच्या आतच आरोपींना पकडत त्यांची परिसरात धिंड काढली. पिंपळे सौदागरमधील काटे पेट्रोल पंप ते गोविंद गार्डन चौक या रस्त्यावर रात्री पार्क केलेल्या नऊ ते दहा वाहनांची रात्री तोडफोड झाली होती. रात्री दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास दुचाकीवर आलेल्या तरुणांनी मोठ मोठी दगडे फेकत गाड्यांच्या काचा फोडल्या होत्या.यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे हलवत काही तासातच आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

# देशाच्या जडणघडणीत धनगर समाजाचे योगदान!

## पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचे मत

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशातील शेवटच्या घटकांतील म्हणजेच एनटी, एसटी आणि ओबीसी समाजातील लोकांच्या हितासाठी भाजपा आणि पंतप्रधान मोदी काम करीत आहेत. महाराष्ट्रातीलच नव्हे; तर देशाच्या कानाकोपऱ्यातून कामगार, कष्टकरी वास्तव्यास आलेले आहेत. धनगर समाज हा अत्यंत कष्टाळू राना- वनात राहणारा म्हणून ओळखला जातो. मात्र, या समाजाने गुणवत्तेच्या आधारे देशाच्या जडणघडणीमध्ये मोठे योगदान दिले आहे, असे मत भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केले.**

दिल्ली येथील ऑल इंडिया धनगर समाज महासंघाच्या पिंपरी-चिंचवड शाखेच्या वतीने धनगर समाजातील इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रविण काकडे, विधानपरिषद आमदार रामहरी रुपनवर, माजी नगरसेवक राजु दुर्गे, आशा शेडगे, वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे, अंकुशराव भांड, अरुण पाडुळे, हनुमंत दुधाळ, निवांत कोळेकर, युवराज नरुटे, गजानन वाघमोडे, वैशाली भोजणे, मुकंद कुचेकर, डॉ. दिनेश गाडेकर, अजय दुधभाते, महावीर काळे, विवेक बिडकर, संतोष पांढरे, नवनाथ देवकाते, संजय कवितके, दिपक



राहिन्स, सोमनाथ ओव्हाळ, यशोदा नाईकवडे, दादा दोलतडे, बिरु व्हनमाने ,सुनिल बनसोडे,धनंजय तानले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ऑल इंडिया धनगर समाज पुणे जिल्हा अध्यक्ष श्री. संजय नायकवाडे यांच्यावतीने भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचा "काठी आणि घोंगडे" देऊन सन्मान केला.

शंकर जगताप म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कार्यकाळात देशातील अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. हाच आदर्श डोळ्यासमोर ठेऊन प्रधानमंत्री नरेंद्र जी मोदी यांनी काशीविश्वेश्वर, वाराणसी, उज्जैन अश्या तीर्थक्षेत्रांचा विकास करण्याचा संकल्प केला आणि तो पूर्णत्वास नेण्यासाठी प्रचंड मेहनत करीत आहेत. पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीमध्ये धनगर समाजातील युवकांचे कामगारांचं कष्टकऱ्यांचं महत्त्वपूर्ण योगदान राहिलं आहे. या समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगामध्ये स्वतःला सिद्ध करत विविध महत्त्वाच्या पदांवरती स्थान मिळवलेला आहे. ऑल इंडिया धनगर समाज महासंघाच्या माध्यमातून असा हा गुणवंतांचा गौरव सोहळा निश्चितच आदर्शवत आहे.


> “ गुणवत्ता विद्यार्थी युवा पिढी हे भारत देशाचे उज्वल भवितव्य आहेत. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्येक पालकांनी आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी अत्यंत चिकाटी आणि आत्मविश्वासाने आपल्या आवडत्या क्षेत्रात प्रगती केली पाहिजे, अशी माझी भावना आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून इयत्ता दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सुरू केलेली आहे. या योजनेचा या गुणवंत विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी लाभ घेतला पाहिजे, तसेच पुढील शिक्षणाच्या दृष्टीने स्पर्धा परीक्षा आणि विविध कौशल्य आधारित कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले पाहिजे.
>
> - शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# अखेरच्या आठवड्यातील ‘कलगीतुरा’




**भाजपने लोकसभेसाठी लिहिलेल्या पटकथेमध्ये राहुल गांधींच्या खासदारकीचा बिब्बा पडू शकतो. त्यामुळे भाजपला अविश्वास ठरावाच्या चर्चेवेळी पटकथा आणि संवाद दोन्ही बदलावे लागू शकते.**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या अखेरच्या आठवड्याची भाजपने अचूक आखणी केली होती. विरोधी पक्षांनी मांडलेल्या अविश्वास ठरावावर आदल्या आठवड्यामध्ये चर्चा होऊ शकली असती, नंतर नियमित कामकाज सुरू ठेवता आले असते. विधेयके मांडता आली असती, विरोधक चर्चेमध्ये सहभागी झाले असते. पण अविश्वास ठरावावर चर्चा न झाल्यामुळे विरोधकांचा गोंधळ थांबला नाही. विरोधकांनी सभात्याग केला. विरोधकांची ही रणनीती एक प्रकारे केंद्र सरकारच्या पथ्यावर पडली. पाच-दहा मिनिटांत केंद्र सरकारने विधेयके मंजूर करून घेतली. भाजपमध्ये चर्चेला फार महत्त्व नसते, आम्ही निर्णय घेतो, त्याची अंमलबजावणीही आम्ही करतो. त्यावर विरोधकांनी वा जनतेने प्रश्न विचारणे अपेक्षित नाही. २०१९ मध्ये काश्मीरचा विशेषाधिकार काढून घेणारे विधेयक केंद्र सरकारने ऐन वेळी आणले, तेव्हा कोणालाही हे विधेयक मांडले जाणार असल्याची माहिती नव्हती. केंद्राने अनुच्छेद ३७० रद्द केला, त्याची अंमलबजावणीही झाली.



विरोधकांच्या सहभागाविना, चर्चेशिवाय विधेयके मंजूर होण्यात केंद्र सरकारचे भले झाले हे खरे; पण त्यातून विरोधकांना कोंडीत पकडण्यातही सत्ताधारी भाजपला यश मिळाले. विरोधी पक्षांच्या ‘इंडिया’ नावाच्या महाआघाडीचे काय करायचे हा भाजपसमोर प्रश्न होता. ‘इंडियन मुजाहिदीन’ वगैरे नावाने बदनाम करण्याच्या प्रयत्नांना फारसे यश आले नाही. भाजपने केलेला हा वार वाया गेला. मग ठरले की, ‘इंडिया’ हा शब्दच उच्चारायचा नाही. त्याऐवजी ‘यूपीए’ म्हणायचे. मोदींनी ‘घमंडिया’ असा शब्दप्रयोग केला. भाजप विरोधकांच्या महाआघाडीला शब्दांतून नाकारत आहे. दिल्लीसंदर्भातील विधेयकावर लोकसभेत झालेल्या चर्चेला उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सातत्याने ‘यूपीए’ला लोक माफ करणार नाहीत, ‘यूपीए’ने अनेक पापे केली आहेत अशी विधाने भाषणामध्ये पेरत होते.

‘इंडिया’ हा शब्द भ्रष्टाचाराशी जोडता येत नाही, ‘यूपीए’ हा शब्द काँग्रेस सरकारच्या काळातील कथित घोटाळ्यांशी थेट जोडता येतो. लोकांच्याही हा शब्द लक्षात राहिलेला आहे. विरोधकांच्या महाआघाडीला भाजपने ‘यूपीए’चा उल्लेख करून प्रत्युत्तर देणे सुरू केले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिल्लीसंदर्भात विधेयकावरील चर्चेवरून विरोधकांना अडचणीत आणले. या अधिवेशनामध्ये नऊ विधेयके संमत झाली तेव्हा विरोधक चर्चेला तयार नव्हते. दिल्लीसंदर्भातील विधेयकावर मात्र चर्चा करायला सगळे एकत्र आले. दिल्लीची सत्ता आम आदमी पक्षाकडे, हा पक्ष विरोधकांच्या महाआघाडीत. एकमेकांचे स्वार्थ जपण्यासाठी विरोधक लोकसभेत गोळा झालेले आहात, असे शहांचे म्हणणे होते. त्यांच्या म्हणण्यामध्ये तथ्य होते; पण त्यांनी रचलेली कथा पूर्णपणे सत्य नाही. या विधेयकाचा संबंध केंद्र व राज्य यांच्या अधिकारकक्षांचा होता.

विरोधकांमध्ये काँग्रेस व माकप वगळता इतर पक्ष प्रादेशिक आहेत, त्यांचे राजकीय हितसंबंधही राज्यांशी निगडित आहेत. दिल्लीसंदर्भातील विधेयकामुळे राज्यांच्या अधिकारांवर अंकुश लागण्याची भीती प्रादेशिक पक्षांना वाटत असल्यामुळे त्यांनी विधेयकावरील चर्चेमध्ये सहभागी होऊन निषेध नोंदवला होता. पण शहांच्या भाषणाने सत्तेच्या केंद्रीकरणाचा मुद्दाच बाजूला पडला. शहांचे लोकसभेतील भाषण येत्या आठवड्यातील मोदींच्या भाषणाची रंगीत तालीम होती. राज्यसभेत अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी कदाचित मणिपूरवर चर्चा होऊ शकेल. पण, लोकसभेत मोदींच्या भाषणानंतर या चर्चेला काही अर्थ उरणार नाही. दिल्लीसंदर्भातील विधेयकाच्या निमित्ताने मोदींच्या ‘आगमना’ची जय्यत तयारी भाजपने करून ठेवली होती.

मोदींनी भाषण द्यायचे आणि विरोधकांना नामोहरम करायचे हे निश्चित झाले होते. पण ऐन वेळी सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींच्या शिक्षेला स्थगिती देऊन खासदारकी बहाल करण्याचा आदेश काढला. आता भाजपपुढे म्हणजे केंद्र सरकारसमोर प्रश्न असा आहे की, राहुल गांधींना तातडीने खासदारकी बहाल करावी की, हिवाळी अधिवेशनाची वाट पाहावी. सर्वोच्च न्यायालयानेच शिक्षेला स्थगिती दिली असल्याने भाजपला खरे तर काहीही करता येण्याजोगे नाही.

## संपादकीय »

# माघार-मोह!

***धडाडी आणि बिनडोक कृती यातील सीमारेषा फार सूक्ष्म आणि धूसर असते. ती कळण्याची कुवत नसेल तर आजची धडाडी ही उद्याचा बिनडोकपणा ठरण्याचा धोका मोठा.***

धडाडी आणि बिनडोक कृती यातील सीमारेषा फार सूक्ष्म आणि धूसर असते. ती कळण्याची कुवत नसेल तर आजची धडाडी ही उद्याचा बिनडोकपणा ठरण्याचा धोका मोठा. असे झाले की मग धडाडीने घेतलेल्या निर्णयाच्या समर्थनार्थ नवनवी कारणे शोधणे आले. अलीकडच्या काळातील अशा काही निर्णयांचा दाखला देण्याची गरज चाणाक्ष वाचकांस नाही. या परिणामांस सामोरे जाता येत नाही असे दिसले की तिसरे आणि नंतर मूळ निर्णयापेक्षा त्याचे परिणामच गंभीर ठरू लागले की चवथे, पाचवे वा पुढचे कारण शोधणे सुरूच राहाते. लॅपटॉप, टॅब्लेट नावाचे छोटे संगणकीय उपकरण यांच्या आयातीवर केंद्र सरकारने घातलेली बंदी, तिचे दुष्परिणाम दिसल्यानंतर निर्णयाच्या समर्थनार्थ नवनवीन कारणांचा शोध आणि नंतर या मूळ निर्णयात बदल हा ताजा उपद्व्याप वरील विवेचनाचे ताजे उदाहरण ठरेल.

**एके काळी उत्तम कामगिरी बजावलेल्या पण आता फारशी चांगली अवस्था नसलेल्या अनेक शासकीय, निम शासकीय संस्था आजही अस्तित्वात आहेत. शेकडो एकरांचा परिसर, इमारती, भरपूर ज्ञान, कुशल कर्मचारी अशी सगळी साधनसंपत्ती असलेल्या या संस्थांचे तत्कालीन उद्दिष्ट आता कालबाह्य झाले असले तरी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा, यंत्रणा यांचा वापर करून या संस्थांना कालसुसंगत उद्दिष्ट देता येऊ शकेल.**

# अमृतकाळ या संस्थांसाठी ‘संजीवनी’ ठरेल?

त्यासाठी गरज आहे ती त्यांच्यामध्ये प्राण फुंकून त्यांची नव्याने उभारणी करण्याची. अमृतकाळाचे हे उद्दिष्ट असायला काय हरकत आहे? स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षांत पंतप्रधानांनी येणाऱ्या २५ वर्षांत सर्व जगात पहिल्या तीन क्रमांकात येऊ असे ‘वंदे भारत’च्या उद्घाटनच्या निमित्ताने सांगितले. हे स्वप्न काही किंवा पूर्ण अंशी प्रत्यक्षात यायचे असेल तर देशातील अनेक मरगळलेल्या संस्थांमध्ये नवीन प्राण व संजीवनी ओतायला लागेल. काही दिवसांपूर्वीच ‘लोकसत्ता’नेच अग्रलेखांमध्ये ‘नवीन प्राण चाहिये’ असे रा. स्व. संघात म्हटले जाणारे पद्य शीर्षक म्हणून दिले होते. अर्थात त्या अग्रलेखाचा रोख हा सत्तारूढ पक्षातील अंतर्गत कारभारावर होता. या लेखाचा विषय वेगळा आहे. सुमारे महिन्याभरापूर्वी तेलंगणातील हैद्राबाद येथे असलेल्या एनआयएमएसएमई (नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर मायक्रो स्मॉल अॅण्ड मीडियम एन्टरप्रायजेस-




म्हणजेच एमएसएमई) या शासकीय संस्थेमध्ये दोन दिवसांसाठी गेलो होतो. हैदराबादमधील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी ही संस्था होती. विस्तीर्ण परिसर, मोठ्या इमारती, प्रशस्त कार्यालये व अगदी राहण्याचाही व्यवस्था प्रचंड मोठ्या खोल्यांत केलेली होती.

या संस्थेमध्ये १९५०-१९६० च्या दशकात खरोखरी एक ऐतिहासिक सामाजिक संशोधन प्रकल्प राबवला गेला होता. केवळ भारतातच नव्हे तर जगभरात त्याची नोंद घेतली गेली होती. त्या संशोधनाबद्दल थोडक्यात येथे उल्लेख करणे उपयुक्त होईल. कारण या लेखाच्या विषयाशी ते संबंधित आहे. उद्योजकता व त्याची प्रेरणा उपजत, जन्मजात असते की व्यक्तींमध्ये त्याचे प्रशिक्षणाद्वारे सिंचन करता येते? असे सिंचन करून उद्योजक प्रेरणा व सिद्धी प्रेरणा वाढली तर नवीन उदयोजक किंवा किंवा चालू आलेल्या उद्योगात लक्षणीय सुधारणा होते का, याबद्दलचे मूलभूत संशोधन त्या वेळेस येथे आले. त्या वेळेला म्हणजे १९६० मध्ये या संस्थेचे नाव स्मॉल इंडस्ट्री एक्स्टेंशन ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (SIET) असे होते. काही वर्षांने त्यात नॅशनल या शब्दाची म्हणजेच न या अक्षराची भर पडून तिचे नामकरण ठरकएळ असे आले. २००७ मध्ये नव्याने नामकरण होऊन नि-मसमे (HTTPS:// WWW. NIMSME. ORG/ GENESIS) असे झाले. उद्योजकतेचे हे प्रयोग आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ डेव्हिड मॅकक्लेलँड व त्यांच्याबरोबरचे भारतीय तज्ज्ञ उदय पारीख, टी. व्ही. राव व मनोहर नाडकर्णी या चमूने विजयवाडा परिसरातील अनेक उद्योजकांच्या प्रशिक्षणातून केले.

## ।। अभंगवाणी ।।



सासुरियां वीट आला भरतारा ।
इकडे माहेरा स्वभावें चि ॥१॥

सांडवर कोणी न धरिती हातीं ।
प्रारब्धाची गति भोगूं आतां ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आमच्या घराण्याला इतिहास अख्खा भाजप आला तरी संपवू शकत नाही!

## आमचं हिंदूत्व केवळ शेंडी-बाम्हणांचं नाही : ठाकरे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ठाकरे नावाला एक इतिहास आहे. आमच्यावर टीका करतात त्यांचा इतिहास तरी काय? आमच्या पिढ्यान पिढ्या महाराष्ट्राच्या चरणी काम करतात. म्हणूनच अख्खा भाजप जरी आला तरी उद्धव ठाकरेंना संपवू शकत नाही, असा टोला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी लगावला. मुंबईतील रंगशारदा सभागृहात ते बोलत होते.**



### भाजपचे सैन्य कुठे, आयाराम भरोसे

भाजपकडे स्वतःचे सैन्य कुठे आहे. सर्व आयाराम आहेत. ते आयारामांचे मंदिर बांधत आहेत. इकडं तुम्ही आमच्यावर घात केला? भाजप केवळ कुटनिती करत आहे. केवळ आपआपसांत भांडण लावतात. आणि नामानिर्माळे होऊन पाहतात.

संभाजी बिग्रेड आणि शिवसेना (ठाकरे गट) यांचा संयुक्त कार्यकर्ता मेळावा पार पडला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी मार्गदर्शन केले. उद्धव ठाकरे म्हणाले की, माझ्यावर सातत्याने आरोप केले जात आहेत. मी हिंदुत्व सोडले आहे. परंतू मी वारंवार सांगतो की, आमचे हिंदुत्व हे शेंडी-बाम्हणांचं अन् सोहळ्याचे हिंदुत्व मुळीच नाही. एकीकडे सांगितले जाते की, हे हिंदुंचे सरकार आहे. आमच्यावर टीका करतात की, यांनी हिंदुत्व सोडले, आरोळी ठोकत आहात. मग जगाच्या सर्वात शक्तीशाली नेता आमच्या देशात आहेत. तर मग तरी देखील सर्वाधिक संख्या असलेल्या हिंदूंना जनआक्रोश मोर्चा काढावा का लागत आहे. संभाजी ब्रिगेडसोबत शिवसेनेने हातमिळवणी का केली. कारण आता सर्वजण डोळे उघडे करून एकत्र आलो आहोत.

महाराष्ट्र, देश वाचवायचा आहे. त्यासाठी ही मैत्री आहे. उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, मला आता देवेंद्रजींची दया येते की, त्या माणसाला आणखी किती ओझे वाहावे लागणार आहेत. कोण आला, कोण गेला एवढाच हिशोब ठेवण्याचे काम त्यांच्यावर आहे. त्यामुळे देवेंद्रजी केवळ आता मस्टर मंत्री झाले आहेत. माझे आजोबा हे नास्तिक नव्हते, अजिबात नव्हते. एकविरा मातेची पूजा, अंधश्रद्धा, डोंगबाजी याला त्याचा विरोध होता. माझ्यात आणि माझ्या देवात बडवा कशाला, मी माझ्या देवाशी थेट बोलेन, असा विचार त्यांचा होता. हुंडाबंदी, केशवेपण यासाठी त्यांनी लढे दिले पाहिजे. त्यांचे योगदान या मातीसाठी खूप आहेत. संयुक्त महाराष्ट्राचा लढयात आमचे घर पुढे होते. अशी आमची घराणेशाही आहे. त्यांची घराणेशाही आहे तरी कुठे हा प्रश्न कायम पडतो. ज्याने ज्याने महाराष्ट्रावर आक्रमण केले तो पुन्हा दिसला नाही, हिंदवी स्वराज्यावर, भगव्यावर चाल करून आला. तेव्हा आम्ही त्यांना संपवली आहे. हा आमचा इतिहास आहे. पण आता देखील सध्या ईडी, सीबीआय, इनकम टॅक्स या रुपात अफजलखान म्हणून आक्रमण करणारे म्हणून काम करत आहेत. गप गुमाने आमच्यात सामील व्हा, अन्यथा संपवले जाईल, अशा धमक्या दिल्या जात आहेत. जे पळकूटे होते त्यांनी पळ काढला. पण आज माझ्यासोबत आहेत ते सर्व कडवे शिवसैनिक आहे.

### रक्षाबंधन मुस्लिम बघिणींकडून करा

महाशक्तीशाली नेता असलेले व एनडीएचे प्रमुख नेत्यांनी यावेळी त्यांच्या बैठकीत सांगितले की, तुम्ही रक्षाबंधन यावेळी मुस्लिम बघिणींकडून करून घ्या. निवडणूका आल्या की, यांना असे सूचते. पण त्याआधी त्यांनी मणिपूरमधील महिलांचा सन्मान केला पाहिजे. तेथील महिलांना सन्मानाची वागणूक देण्यासाठी पावले उचलली पाहिजे. असे उद्धव ठाकरे म्हणाले. दुसरी बाब म्हणजे मुस्लिम बघिणींकडून रक्षाबंधण करून घ्यायचे असेल तर मग बिल्किस बानो हिच्याकडून करून घ्या, तिला न्याय द्या, ही हिंमत भाजपमध्ये आहे का, असा सवाल देखील उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.

---

# पुढची पिढी आम्हाला माफ करणार नाही!

## जयंत पाटलांच्या भेटीनंतर जितेंद्र आव्हाडाचं ट्विट

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे पुणे दौऱ्यावर आहेत. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अमित शहांची भेट घेतली असल्याची चर्चा रंगली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच आज सकाळी ही भेट घडवून आणली असल्याचं म्हटलं जात होते. दरम्यान, जयंत पाटील यांनी अमित शहांची भेट घेतल्याचं वृत्त फेटाळून लावलं आहे.**

यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही ट्वीट करत जयंत पाटील कुठेही जाणार नसल्याचं म्हटलं आहे. जयंत पाटील यांच्याबद्दल जाणूनबुजून संभ्रम निर्माण केला जात असल्याचंही त्यांनी म्हटलं. जितेंद्र आव्हाडांनी आज जयंत पाटलांची भेट घेतली, त्यानंतर ट्वीट करत ही माहिती दिली.

यावेळी आव्हाडांनी या भेटीचा काही सेकंदांचा व्हिडीओही शेअर केला. जितेंद्र आव्हाड ट्वीटमध्ये म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रांताध्यक्ष जयंत पाटील यांच्याबद्दल काही जणांकडून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात



आहे. ते कोणाला तरी भेटून आले, ते मंत्री होणार आहेत, त्यांनी गावातून लोकांना बोलावलं, अशा प्रकारच्या बातम्या जाणूनबुजून पेरण्यात येत आहेत.

ही पेरणी कशासाठी केली जातं आहे, हे आम्हाला बरोबर समजतंय. जयंत पाटील यांच्याबरोबर माझं वैयक्तिक बोलणं झालं आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितलं की, शरद पवारसाहेबांनी लढायचा इशारा दिला आहे आणि आता थांबायचं नाही. जितेंद्र आव्हाड पुढे म्हणाले, आम्ही लढणार आहोत, आम्ही लढणार आहोत, असं प्रत्येक नेत्यानं दररोज सांगावं, असं मला वाटत नाही. आम्ही मागेच सांगितलं आहे की, आम्ही पवारसाहेबांच्या खांद्याला खांदा लावून लढणार आहोत. त्या भूमिकेत काहीच फरक पडणार नाही. त्यामुळे कृपया अशा अफवांवर विश्वास ठेवू नका. आमचं ठरलंय, आम्ही लढणार म्हणजे लढणारच आहोत.

### लोकशाही वाचवणं काळाची गरज

लोकशाहीचं पवित्र मंदिर वाचवणं, ही काळाची गरज आहे. आम्ही जर असं केलं नाही तर, पुढची पिढी आम्हाला कधीच माफ करणार नाही. सत्ता येते आणि जाते. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानातून निर्माण झालेली संसदीय लोकशाही वाचली नाही, तर पुढची पिढी आम्हाला कधीचं क्षमा करणार नाही, असंही आमदार आव्हाड म्हणाले.

# उत्तराखंड गौरीकुंडमध्ये भूस्खलन

## » 3 ठार, 20 बेपत्ता : बेपत्तापैकी 17 नागरिक नेपाळचे

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**उत्तराखंडच्या गौरीकुंडमध्ये भूस्खलनामुळे 3 जणांचा मृत्यू झाला, तर 20 जण बेपत्ता झाले. उत्तराखंडचे डीजीपी अशोक कुमार यांनी सांगितले की, रुद्रप्रयाग जिल्ह्यातील केदारनाथ धाम यात्रेच्या मार्गावर शुक्रवारी हा अपघात झाला. बचाव पथक शोध मोहीम राबवत आहे. बेपत्ता झालेल्यांपैकी 17 नेपाळचे नागरिक आहेत.**



उत्तराखंडमधील टिहरी गढवाल जिल्ह्यात शनिवारी रात्री पावसामुळे घराची भिंत कोसळली. भिंतीखाली दबून दोन मुलांचा मृत्यू झाला. दुसरीकडे नैनितालमध्ये पुलावरून जाणारी बस उलटली. बसमधील 35 जणांना जेसीबीने वाचवण्यात यश आले. रविवारी सकाळी जम्मू-काश्मीरच्या रामबन जिल्ह्यातही दरड कोसळली. त्यामुळे जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग टी-2 बोगद्याजवळ रोखण्यात आला. तासाभराच्या प्रयत्नानंतर प्रशासनाने ढिगारा हटवून रस्ता वाहतुकीसाठी खुला केला.

मध्य प्रदेशातील सतना जिल्ह्यात शनिवारी संध्याकाळी बकिया बॅरेजचे 13 दरवाजे उघडण्यात आले. त्यामुळे रेवा येथील तराई भागात पुराचा धोका वाढला आहे. येथे होमगार्ड आणि एसडीईआरएफच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. राजस्थानच्या पूर्व भागात काल संध्याकाळी उशिरा मुसळधार पाऊस झाला.

करौली, धौलपूर, सवाई माधोपूर जिल्ह्यात एक ते सात इंच पावसाची नोंद झाली. धौलपूरमध्ये अनेक ठिकाणी पूर आला असून शाळेची भिंत कोसळली आहे. आज भरतपूर आणि कोटा विभागात पावसाची शक्यता आहे. रविवारीही राज्याच्या पूर्व भागात मान्सून प्रणालीची सक्रियता दिसून येणार आहे. विशेषत: रेवा विभागात येत्या 24 तासांत मध्यम ते मुसळधार पाऊस पडू शकतो.

जबलपूर येथील बरगी धरणातून पाणी सोडल्याने नर्मदेच्या पाण्याची पातळी वाढली आहे. नर्मदापुरममधील सेठानी घाटातील पाण्याची पातळी शनिवारी 956 फुटांवर गेली होती. राजधानी लखनऊ आणि जालौनमध्ये आज सकाळी 11 वाजल्यापासून मुसळधार पाऊस पडत आहे. पावसाची ही प्रक्रिया आता सुरूच राहणार आहे.

हवामान खात्याने आजही पूर्व उत्तर प्रदेशातील 20 जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. एवढेच नाही तर पश्चिम उत्तर प्रदेशातील काही जिल्ह्यांमध्येही पावसाची शक्यता आहे.

### 10 जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा इशारा

» राजधानी पाटणासह बिहारच्या अनेक जिल्ह्यांमध्ये आज हवामान आल्हाददायक राहील. 10 जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. आजपासून 9 ऑगस्टपर्यंत उत्तर बिहारवर मान्सून कृपा करेल. यादरम्यान मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. हवामान खात्याने हरियाणातील 6 जिल्ह्यांमध्ये पावसाबाबत यलो अलर्ट जारी केला आहे. अन्य 16 जिल्ह्यांत काही ठिकाणी हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे. उद्यापासून 9 ऑगस्टपर्यंत मान्सून कमकुवत स्थितीत राहील. 10 ऑगस्टपासून राज्यात पुन्हा एकदा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार !

## » मणिपूरमध्ये 24 तासांत 6 हत्या, 16 जखमी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**गेल्या तीन महिन्यांपासून मणिपूरमध्ये सुरू असलेला हिंसाचार थांबण्याचं नाव घेत नाहीये. गेल्या २४ तासांत मणिपूरमधील तणावग्रस्त भागात पिता-पुत्रासह एकूण सहा जणांचा मृत्यू झाला आहे. शनिवारी सकाळपासून बिष्णुपूर-चुराचांदपूर सीमा भागात मोठ्या प्रमाणात हिंसाचार सुरू आहे.**



या भागात झालेल्या हिंसाचारात १६ जण जखमी झाले आहेत. त्यामुळे या भागात लष्कराला पाचारण करण्यात आलं असून लष्करी जवानांनी या भागात शोधमोहीम सुरू केली आहे. बंदुकीची गोळी लागून जखमी झालेल्या एका बंडखोराला लष्कराने ताब्यात घेतलं आहे. सुरक्षा दलातील सूत्रांनी एनडीटीव्हीला सांगितलं की, या भागात काल सायंकाळी झालेल्या हत्यांपैकी दोन जणांना खूप जवळून गोळ्या घातल्या आहेत. तसेच त्यांना गोळ्या घालण्यापूर्वी त्यांच्या शरीराच्या वेगवेगळ्या भागांवर धारदार शस्त्रांनी वार करण्यात आले होते.

दरम्यान, राज्यातील अनेक भागांमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. बिष्णुपूर-चुराचांदपूर सीमेवर शनिवारी (५ ऑगस्ट) अनेक ठिकाणी मोर्टार आणि ग्रेनेड हल्ले झाले. तसेच दोन्ही बाजूंनी जोरदार गोळीबार झाला. गेल्या दोन आठवड्यांपैकी कालच्या दिवशी इम्फाळसह बिष्णुपूर-चुराचांदपूरमधली परिस्थिती खून नाजूक होती.

### एकाच गावातील पाच जणांचा बळी

शनिवारी पहाटे झालेल्या हल्ल्यात बिष्णुपूर जिल्ह्यातील क्वाकटा भागातील एका गावात पिता-पुत्रासह तीन ग्रामस्थांची हत्या करण्यात आली आहे. खरंतर ३ मेपासून या भागातली परिस्थिती गंभीर आहे. त्यामुळे या गावांमधील लोकांना मदत शिबिरांमध्ये हलवण्यात आलं होतं. परंतु, या गावातील काही लोक शुक्रवारी त्यांच्या घरी परतले होते. गावकरी गावात परतल्यानंतर काहीच तासांत त्यांच्यावर हल्ला झाला. या हल्ल्यात एकाच गावातील पाच जणांचा बळी गेला आहे.

# ज्ञानवापीच्या घुमटात मिळाल्या डिझाइन्स

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

ज्ञानवापी येथे भारतीय पुरातत्व सर्वेक्षणचे (एएसआय) चौथ्या दिवसाचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. रविवारी सकाळी एएसआयने सर्वप्रथम मुस्लिम बाजूकडून चावी घेऊन व्यास तळघराचे कुलूप उघडले. ते साफ करून एक्झॉस्ट बसवले. त्यानंतर सर्वेक्षणाला सुरुवात झाली. ज्ञानवापीचे तीनही घुमट आणि परिसराचे सर्वेक्षण करण्यात आले. व्यास तळघरात एएसआयने मोजमाप घेतले. भिंतींची 3-डी फोटोग्राफी, स्कॅनिंग केले. भिंतींवर आढळलेल्या कलावस्तूंचे मुद्दे तक्त्यामध्ये नमूद केले. कानपूर आयआयटीचे दोन जीपीआर तज्ञही सर्वेक्षण पथकासोबत होते. एक-दोन दिवसांत जीपीआर मशिनद्वारे सर्वेक्षण सुरू होऊ शकते, असे सांगण्यात येत आहे. 12.30 वाजता टीमने दुपारचे जेवण आणि प्रार्थनेसाठी विश्रांती घेतली. दुपारी अडीच वाजल्यापासून पुन्हा सर्वेक्षण सुरू करण्यात आले. यानंतर सायंकाळी 5 वाजेपर्यंत सर्वेक्षणाचे काम करण्यात आले. मुस्लीम पक्षाने लवकरच मुख्य तळघराच्या चाव्या देणार असल्याचे म्हटले आहे. चौथ्या दिवशी, एएसआय टीमला घुमटांच्या सर्वेक्षणादरम्यान गोलाकार छतामध्ये अनेक डिझाइन आढळले. हॉलमध्येच तीन डोम सिलिंगमध्ये टीमने अनेक डिझाइन्स पाहिल्या. त्यांची फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफी एकामागून एक करण्यात आली. या सभामंडपात मंदिरांमध्ये दिसणारे 20 हून अधिक आळे (भिंतीमध्ये बनवलेले कॅबिनेट, त्याला पूर्वांचलमध्ये टाके म्हणतात) पाहिले गेले आहेत. आळ्यांची रचना आणि त्यांच्या सभोवतालची वैशिष्ट्ये यांचे 3-डी मॅपिंग देखील होते.

# सनी देओल-अमिषाने अटारी बॉर्डरवर केला डान्स

सनी देओल त्याच्या चित्रपट कारकिर्दीत भलेही पाकिस्तानविरोधी भूमिकांमध्ये दिसला असेल, पण पाकिस्तानातील चाहत्यांना तो अजूनही आवडतो. सनी अलिकडेच रिट्रीट सेरेमनी पाहण्यासाठी आणि त्याच्या आगामी 'गदर-2' चित्रपटाच्या प्रमोशनसाठी अटारी बॉर्डरवर पोहोचला. त्याला पाहण्यासाठी भारतासोबतच पाकिस्तानातील चाहतेही पोहोचले.

सनी देओलसोबत गदर चित्रपटाची नायिका अमिषा पटेल आणि गायक उदित नारायणही अटारी बॉर्डरवर पोहोचले. सनी देओल गदरमधील तारा सिंहच्या वेषात होता, तर अमिषा पटेल पूर्ण सकीना गेटअपमध्ये होती. यावेळी उदित नारायण यांनी गदर चित्रपटातील घर आजा परदेसी हे हिट गाणे गायले. तर सनी देओल आणि अमिषा पटेल यांनी या गाण्यावर डान्स केला. भारतासोबतच पाकिस्तानच्या बाजूने बसलेल्या सनीच्या चाहत्यांनीही हे बघून खूप जल्लोष केला. गोल्डन गेटच्या एका बाजूला रिट्रीटनंतर सनी झिरो लाइन पाहण्यासाठी अटारीलाही गेला. यादरम्यान सनीने पाकिस्तानातील त्याच्या चाहत्यांचीही भेट घेतली. त्याला पाहण्यासाठी त्याच्या चाहत्यांची गर्दी काटेरी तार ओलांडून शून्य रेषेवर पोहोचली होती. सनीने हात जोडून सर्वांचे हात वर करून अभिवादन केले. सनी देओल सध्या गदर-2 च्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. यादरम्यान तो सीमेवर बीएसएफच्या जवानांचीही भेट घेणार आहेत. त्याने अमृतसरमध्ये बीएसएफ जवानांसोबत वेळ घालवला आणि संपूर्ण टीमसोबत छायाचित्रेही घेतली. सनी देओलने रविवारी लोंगोवाला येथे जाऊन माता तनोत देवीचे दर्शन घेतले. याच ठिकाणी भारत-पाकिस्तान युद्ध झाले होते आणि त्यावर आधारित चित्रपट बॉर्डरमध्ये सनी देओल मुख्य भूमिकेत दिसला.



# मुघल-ए-आझमच्या रिलीजला 63 वर्षे

मुघल-ए-आझम या चित्रपटाने प्रदर्शित होऊन 63 वर्षे पूर्ण केली आहेत. यावेळी सायरा बानो यांनी चित्रपटातील एक व्हिडिओ क्लिप सोशल मीडियावर शेअर करून दिलीप कुमार यांना श्रद्धांजली वाहिली आहे. नोट शेअर करताना सायरा बानो यांनी लिहिले की, या ऐतिहासिक ऐतिहासिक चित्रपटातील दिलीप साहब यांचा उत्कृष्ट अभिनय लोक आजपर्यंत विसरू शकले नाहीत. हा चित्रपट कालातीत म्हणजेच शेवटपर्यंत स्मरणात राहील असेही त्यांनी लिहिले आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन के आसिफ यांनी केले होते. या चित्रपटात दिलीप कुमार यांनी राजकुमार सलीमची भूमिका साकारली होती. हा चित्रपट 1960 मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात दिलीप कुमारसोबत पृथ्वीराज कपूर, मधुबाला आणि दुर्गा खोटे यांच्या प्रमुख भूमिका होत्या. सायरा बानो यांनी शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये प्यार किया तो डरना किया आणि मोहे पंगत पे या चित्रपटातील लोकप्रिय गाण्यांचा समावेश आहे. सायरा बानो यांनीही या चित्रपटातील सलीमच्या भूमिकेचे कौतुक केले. त्यांनी लिहिले – दिलीप साहेबांनी चित्रपटात प्रेम केले आणि बंडखोरीही केली. सलीमच्या पात्रात त्यांनी जीव ओतला. चित्रपटाचे छायांकन आणि कलाकारांचा अभिनय इतका चांगला आहे की आजही हा चित्रपट पाहताना लोकांना मुघल युगात घेऊन जातो, असेही त्या म्हणाल्या. सायरा बानो यांनी पुढे लिहिले - चित्रपट बनवण्याचा प्रवासही सुंदर होता. सुमारे 10 वर्षांत बनवलेल्या या चित्रपटात प्रत्येक छोट्या-छोट्या गोष्टींवर पूर्ण लक्ष ठेऊन काम करण्यात आले आहे.



# साराचे टिकली लावून फोटोशूट

मासिकाच्या डिजिटल कव्हर पेजवर बॉलिवूड अभिनेत्री सारा अली खान दिसली. साराने मॅगझिनसाठी फोटोशूट केले आहे, ज्याचा एक BTS व्हिडिओ अभिनेत्रीने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये सारा टिकली लावून फोटोशूट करताना दिसत आहे. व्हिडिओमध्ये सारा वेगवेगळ्या पोशाखात दिसत आहे. टिकली लावूनन तिने कॅमेऱ्यासमोर जोरदार पोज दिली. व्हिडिओ शेअर करताना अभिनेत्रीने कॅप्शनमध्ये लिहिले - 'विंटेज बिंदी'. यापूर्वी साराने सोशल मीडियावर कव्हर पेजचा एक फोटो शेअर केला होता, ज्यामध्ये ती रेशमी हिरव्या रंगाच्या साडीत दिसली होती. फोटो समोर येताच काही लोक साराचे कौतुक करत आहेत, तर अनेक लोक तिच्या एक्सप्रेशन आणि ड्रेसमुळे तिला ट्रोल करताना दिसत आहेत. सारा अली खानच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे तर 2 जून रोजी साराचा 'जरा हटके जरा बचके' हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटात विकी कौशल मुख्य भूमिकेत होता. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली आहे. आता ती लवकरच आदित्य रॉय कपूरसोबत 'मेट्रो इन दिनों' या चित्रपटात दिसणार आहे. अनुराग बासू दिग्दर्शित हा चित्रपट पुढील वर्षी मार्च २०२४ मध्ये प्रदर्शित होणार आहे. आदित्य, सारा व्यतिरिक्त या चित्रपटात अनुपम खेर, नीना गुप्ता, पंकज त्रिपाठी, कोंकणा सेन शर्मा, अली फजल आणि फातिमा सना शेख हे कलाकार देखील दिसणार आहेत. याशिवाय त्याच्याकडे 'ए वतन मेरे वतन' आणि 'मर्डर मुबारक' हा चित्रपटही आहे.



# इलियाना डिक्रूझने दिला मुलाला जन्म

अभिनेत्री इलियाना डिक्रूझ आई झाली आहे. तिने एका मुलाला जन्म दिला आहे. इलियानाने सोशल मीडियावर पोस्ट करत याबाबत माहिती दिली. मुलाचा फोटो शेअर करत इलियानाने असेही लिहिले की, हा आनंद व्यक्त करण्यासाठी तिच्याकडे शब्द नाहीत.

इलियानाच्या मुलाचा जन्म 1 ऑगस्टला झाला मात्र तिने याची माहिती 5 ऑगस्टला दिली. अभिनेत्रीने तिच्या मुलाचे नाव कोआ फिनिक्स डोलन ठेवले आहे. इलियानाने शेअर केलेल्या फोटोमध्ये तिचे नुकतेच जन्मलेले बाळ झोपलेले दिसत आहे. लिहिले- मुलाला जगात आणून आम्ही किती आनंदी आहोत हे शब्दात व्यक्त करणे कठीण आहे. इलियानाच्या या पोस्टवर अनेक सेलिब्रिटींनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. अर्जुन कपूर, हुमा कुरेशी, नर्गिस फाखरी, अथिया शेट्टी आणि सोफी चौधरी यांनी इलियानाचे अभिनंदन केले आहे. इलियानाने कधीही तिच्या जोडीदाराचे नाव उघड केले नाही. जरी ती अनेकदा तिच्या जोडीदारासह अस्पष्ट फोटो पोस्ट करते. यामध्ये जोडीदाराचा चेहरा स्पष्ट दिसत नाही. मात्र, मीडिया रिपोर्ट्सनुसार इलियानाने या वर्षी मे महिन्यात मायकल डोलन नावाच्या परदेशी व्यक्तीशी लग्न केले.

# फायनलमध्ये प्रणय पराभूत!

## » चीनचा वेंग होंगयांग विजयी; दीड तास चालला सामना

**नवी दिल्ली । नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**ऑस्ट्रेलियन ओपन बॅडमिंटनमध्ये भारताच्या एचएस प्रणयला फायनलमध्ये चीनच्या वेंग हाँग यांगविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले. वेंग हाँगने अंतिम फेरीत त्याचा 9-21, 21-23, 22-20 असा पराभव केला. दोन्ही गेम जिंकून पहिला गेम गमावल्यानंतर वेंगने पुनरागमन केले.**



प्रणयने पहिल्या उपांत्य फेरीत देशबांधव प्रियांशू राजावतचा 21-18, 21-12 असा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले होते. उपांत्य फेरीत वांग हाँग यांगने मलेशियाच्या ली जी जियाचा 21-19, 13-21, 21-13 असा पराभव केला. प्रणय आणि वेंग हाँग यांग यांच्यातील अंतिम सामना एक तास 30 मिनिटे चालला. प्रणयने पहिल्या गेममध्ये एकतर्फी विजय मिळवला. त्याने वेंगचा 21-9 असा पराभव केला. आणि दुसऱ्या गेममध्ये वेंगने प्रणयला आव्हान देत हा गेम 23-21 असा आपल्या नावे केला. प्रणयने तिसऱ्या गेममध्ये वेंगला आव्हान दिले. पण प्रणयने हा गेम 22-20 असा गमावला.

एचएस प्रणय आणि प्रियांशू राजावत यांच्यातील उपांत्य फेरीचा सामना एकतर्फी झाला. प्रणयने प्रियांशूचा 21-18, 21-12 असा अवघ्या 43 मिनिटांत पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. प्रियांशूने उपांत्यपूर्व फेरीत किदांबी श्रीकांतला 21-13, 21-8 असे अवघ्या 30 मिनिटांत पराभूत केले होते. प्रणयने त्याचे सुरुवातीचे तीन फेरीचे सामने 3-3 गेममध्ये जिंकले. त्याने पहिल्या फेरीत हाँगकाँगच्या ली चेउक य्यूचा, दुसऱ्या फेरीत तैवानच्या ची यू जेनचा आणि तिसऱ्या फेरीत इंडोनेशियाच्या अँथनी सिनिसुका गिंटिंगचा पराभव केला.

### राजावतचा पराभव करून अंतिम फेरीत

» प्रणयने पहिल्या उपांत्य फेरीत देशबांधव प्रियांशू राजावतचा 21-18, 21-12 असा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले होते. उपांत्य फेरीत वांग हाँग यांगने मलेशियाच्या ली जी जियाचा 21-19, 13-21, 21-13 असा पराभव केला.

# पाकचे वर्ल्डकपसाठी 13 खेळाडू

## » सरफराजचाही संभाव्य खेळाडूंमध्ये समावेश

**नवी दिल्ली । नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) दोन महिन्यांनंतर सुरू होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकासाठी संभाव्य खेळाडूंची निवड केली आहे. विश्वचषक संघात 15 खेळाडूंचा समावेश असेल, पीसीबीच्या थिंक टँकने (तज्ञ) यासाठी 13 खेळाडूंची निवड केली आहे. उर्वरित 2 जागांसाठी 6 खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. संघ जाहीर करण्याची अंतिम मुदत 5 सप्टेंबर आहे, त्यापूर्वी 6 पैकी 2 निवडलेल्या खेळाडूंचा समावेश असलेला अंतिम संघ जाहीर केला जाईल.**



पाकिस्तानच्या जिओ न्यूज चॅनलच्या वृत्तानुसार, फक्त बाबर आझम संघाचे नेतृत्व करणार आहे. 13 संभाव्य खेळाडूंमध्ये आगा सलमान, उसामा मीर आणि मोहम्मद वसीम ज्युनियर यांच्या नावांचा समावेश करण्यात आला आहे. संघाला इमर्जिंग आशिया चषक जिंकवून देणारा कर्णधार मोहम्मद हरिस आणि अब्दुल्ला शफीक आणि न्यूझीलंडविरुद्धच्या शेवटच्या एकदिवसीय मालिकेतील इहसानुल्ला खान यांनाही 13 खेळाडूंमध्ये स्थान मिळाले नाही. 13 संभाव्य खेळाडूंची निवड केल्यानंतर विश्वचषक संघात केवळ 2 खेळाडूंचा समावेश केला जाईल. सर्फराज अहमद, शान मसूद, अब्दुल्ला शफीक, सौद शकील, मोहम्मद हरीस आणि तय्यब ताहिर यांच्यात दोन जागांसाठी शर्यत आहे. विश्वचषक संघात 15 खेळाडूंसह 3 राखीव खेळाडूंचीही नावे देण्यात येणार आहेत. या परिस्थितीनुसार, निवडलेल्या 6 खेळाडूंपैकी 2 मुख्य संघात स्थान मिळवतील, तर उर्वरित 4 पैकी कोणत्याही 3 खेळाडूंना राखीव खेळाडूंमध्ये स्थान मिळण्याची संधी असेल. शॉर्टलिस्ट खेळाडूंमध्ये समाविष्ट असलेल्या सरफराज अहमदने त्याच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानला 2017 ची चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकून दिली होती. या संघाने अंतिम फेरीतच भारताचा पराभव केला होता. सर्फराज राखीव खेळाडूंचा एक भाग राहिला तरी तो विश्वचषकादरम्यान भारतात येऊ शकतो. स्पर्धेदरम्यान किंवा त्याआधी कोणताही खेळाडू दुखापतग्रस्त झाल्यास, दुखापतग्रस्त खेळाडूच्या जागी सरफराजचा मुख्य संघात समावेश केला जाऊ शकतो. विश्वचषक स्पर्धेसाठी संघ जाहीर करण्याची अंतिम मुदत 5 सप्टेंबर आहे. पाकिस्तानचा संघ 22 ऑगस्टपासून अफगाणिस्तानविरुद्ध 3 वनडे मालिका खेळणार आहे. वृत्तानुसार, यादरम्यान पाकिस्तान बोर्ड आपला अंतिम विश्वचषक संघही जाहीर करेल. अफगाणिस्तानची वनडे मालिका श्रीलंकेत होणार आहे.

### ऑलिम्पिकला जाण्याची संधी हुकली

» वृत्तानुसार, सुरक्षेच्या कारणास्तव पाकिस्तान क्रिकेट संघाचे 3 विश्वचषक सामने पुन्हा शेड्यूल केले जाऊ शकतात. भारताविरुद्ध त्यांचा सामना 15 ऑक्टोबरला होणार होता, मात्र तो आता 14 ऑक्टोबरला होणार आहे. यामुळे संघाचा श्रीलंकेविरुद्धचा सामना 12 ऐवजी 10 ऑक्टोबरला होणार आहे. त्याचबरोबर कोलकात्यात इंग्लंड विरुद्ध संघाचा सामना 12 नोव्हेंबरऐवजी 11 नोव्हेंबरला होणार आहे. बीसीसीआय आणि आयसीसी लवकरच स्पर्धेचे अद्ययावत वेळापत्रक जाहीर करतील.

# T20 मधून निवृत्तीचा विचार नाही : रोहित

**नवी दिल्ली । नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

भारताचा कर्णधार रोहित शर्माने कॅलिफोर्नियातील एका कार्यक्रमादरम्यान सांगितले की 2024 टी-20 विश्वचषक अमेरिकेत खेळला जाईल. त्यामुळे मी पुन्हा इथे येण्यास उत्सुक आहे. रोहित म्हणाला, एन्जॉय करण्याव्यतिरिक्त अमेरिकेत येण्याचे आणखी एक कारण आहे. कारण तुम्हाला माहिती आहे, जून 2024 मध्ये T20 विश्वचषक होणार आहे. हे खूप रोमांचक असेल आणि आम्ही त्याची वाट पाहत आहोत.

2024 टी-20 विश्वचषक वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत खेळवला जाईल. रोहित शर्मा 36 वर्षांचा झाला आहे. अशा परिस्थितीत पुढील वर्षी जूनमध्ये वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत होणाऱ्या टी-20 विश्वचषक स्पर्धेत खेळण्याची त्याची शक्यता कमी वाटत होती, परंतु त्यानेच आता निवृत्तीचा विचार नसल्याचे संकेत दिले आहेत. रोहितने 9 महिन्यांपासून एकही आंतरराष्ट्रीय टी-20 सामना खेळलेला नाही. 2022 च्या T20 विश्वचषकानंतर भारताच्या T20 संघात मोठा बदल झाला आहे. अलीकडच्या काळात हार्दिक पांड्या या फॉरमॅटमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व करत आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीसारख्या खेळाडूंऐवजी संघ निवडकर्ते तरुणांना संधी देण्यास प्राधान्य देत आहेत. वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी आणि एकदिवसीय मालिकेनंतर रोहित शर्मा सध्या ब्रेकवर आहे. त्याला आणि विराट कोहलीला शेवटच्या 2 वनडेसाठी विश्रांती देण्यात आली होती. आता हे दोन्ही भारतीय खेळाडू 30 ऑगस्टपासून होणाऱ्या आशिया कपमध्ये दिसणार आहेत. आशिया चषकात भारताचा पहिला सामना 2 सप्टेंबरला पाकिस्तानशी होणार आहे. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दुसरा T20 सामना आज रात्री 8 वाजल्यापासून खेळवला जाईल. हा सामना गयाना येथील प्रोव्हिडन्स स्टेडियमवर होणार असून, नाणेफेक संध्याकाळी 7:30 वाजता होणार आहे.